# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.03.2026** **वार- मंगळवार**

---

**कृषी एआय**

शेतकऱ्यांना दर्जेदार शेती साहित्य रास्त दरात उपलब्ध करून देण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर करून शेतीपूरक उपाय देण्याचे काम बारामती तालुका सहकारी खरेदी विक्री संघ करीत आहे. या सुविधांचा लाभ शेतकऱ्यांनी घेण्याचं आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं आहे. बारामती तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाच्या बारामतीच्या शेती औषधे, बियाणे आणि खतांच्या घाऊक आणि किरकोळ विभागाचे उद्‌घाटन पवार यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्ड इथं झालं त्यावेळी त्या बोलत होत्या.संस्थेची आर्थिक उलाढाल चालू आर्थिक वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत 160 कोटी रुपयांहून अधिक झाली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**कर्ज वितरण**

पुण्यातील जिल्हा सल्लागार समिती बैठकीत अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी बँकांना येत्या 31 मार्चपर्यंत कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पीएम विश्वकर्मा योजना, स्वनिधी योजना आदी योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत. यासाठी बँकेकडे सादर झालेली कर्ज मागणीची प्रकरणे वेळेत मंजूर करण्याची कार्यवाही करावी असंही राऊत यांनी यावेळी सांगितलं.

**चॅटबॉट**

"तंत्रज्ञानाचा योग्य वापर हा समाज परिवर्तनाचा प्रभावी मार्ग ठरू शकतो," असे प्रतिपादन विजय भटकर यांनी आज पुण्यात केलं. संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांच्या द्विभाषिक 'आयटी करिअर गुरू' या जगातील पहिल्या चॅटबॉटचे आज भटकर यांच्या हस्ते लोकर्पण करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिकारपूरकर यांनीही विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळवावं असं मत व्यक्त केलं. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात तंत्रज्ञान, शिक्षण आणि नवोपक्रम यावर मार्गदर्शन करण्यात आले.

**निबंधक**

मालमत्तांची खरेदी- विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी आणि आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नोंदणी आणि मुद्रांक विभागाची सर्व कार्यालये 26, 28, 29 आणि 31 मार्च या सुट्ट्यांच्या दिवशीही नियमितपणे सुरू राहणार आहेत. पुणे नोंदणी उपमहानिरीक्षक उदयराज चव्हाण यांनी या संदर्भातील आदेश दिले आहेत.

**संवादसत्र**

पुण्यात उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी करण्याची गरज असल्याचं मत एल अँड टी मेट्रोरेलचे माजी मुख्य कार्यकारी विवेक गाडगीळ यांनी व्यक्त केलं आहे. अभिनव अभियांत्रिकी स्थापत्य केंद्रातर्फे आयोजित संवादसत्रात ते आज बोलत होते. अभियांत्रिकी क्षेत्रात मोठ्या संधी असूनही कुशल मनुष्यबळाची कमतरता असल्याचं देखील गाडगीळ यांनी सांगितलं.

**अभय**

पुणे महापालिकेच्या अभय योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असून गेल्या चार महिन्यांत ९ शे ५४ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. १ लाख ६४ हजारांहून अधिक मिळकत धारकांनी योजनेचा लाभ घेत दंडावर ७५ टक्के सूट मिळवली. याशिवाय, लाभ न घेतलेल्या १९ हजारांहून अधिक नागरिकांनीही ११५ कोटी रुपये भरले. तर एकंदर १ हजार ७० कोटींचा मिळकत कर जमा झाला आहे. थकबाकी वसुलीसाठी योजना प्रभावी ठरल्याचे महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाचे प्रमुख रवी पवार यांनी सांगितले.

**जिल्हापरिषद अंदाजपत्रक**

पुणे जिल्हा परिषदेची अर्थसंकल्पीय सभेत आज मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी ३०१ कोटी रुपयांचा अंदाजपत्रक सादर केलं. कौशल्य सेतू', एआय शिक्षण, दोन सायन्स पार्क, 'दिव्यांग स्वावलंबन', महिलांसाठी 'माझे अस्तित्व' योजना आणि सोलर पार्कद्वारे 'गावचा सूर्य, गावची वीज' उपक्रमांवर भर देण्यात आला आहे.

**एचपीव्ही**

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर आजारांपैकी एक असून योग्य वेळी घेतलेली एचपीव्ही अर्थात ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस लस या आजाराविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय ठरू शकत असल्याचं मत पिंपरी चिंचवड शहरातील प्रतिष्ठित बालरोगतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत शहरात १४ वर्षे वयोगटातील पात्र मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. सर्व लाभार्थ्यांची नोंद यू-विन पोर्टलवर करण्यात येत असून अधिकाधिक मुलींना या मोहिमेचा लाभ मिळावा यासाठी वैद्यकीय विभागामार्फत जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**सभा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. बैठकीत शहरातील विविध विकासकामांशी संबंधित विषयांवर चर्चा करून त्यांना मान्यता देण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. दरम्यान महापालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार सूर्यवंशी यांनी आज मावळते आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडून स्वीकारला.

**निधन-काकडे**

ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री आसावरी काकडे यांचं आज पुण्यात निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. मराठी आणि हिंदी भाषेत साहित्य रचनेखेरीज त्यांनी दोन्ही भाषामधील साहित्य परस्परात अनुवादित केलं होतं. त्यांच्या कविता शालेय अभ्यासक्रमातही समाविष्ट झाल्या होत्या. चंद्रप्रकाश देवल यांच्या बोलो माधवी या काव्यसंग्रहाचा त्यांनी केलेल्या अनुवादाला साहित्य अकादमीचा अनुवादासाठीचा पुरस्कार मिळाला होता. राज्यशासनाच्या साहित्य पुरस्कारांसह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**